# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

राष्ट्रीय महामार्ग क्र. ६, जळगाव ४२५००२

दूरध्वनी क्र. ०२५७-२२८१५२२ फॅक्स क्र. ०२५७-२२८१३१९ Email :- princoej@ rediffmail.com Website : www.gcoej.ac.in

शाअमज / विवि / २०२१ / 1912 दि. 24 NOV 2021

## परिपत्रक

**विषय:** कोव्हीड लसीचे दोन डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ चे वर्ग / प्रात्यक्षिके प्रत्यक्ष (ऑफलाईन) सुरु करण्याबाबत ...

**संदर्भ:** शैक्षणिक वर्ष २०२१-२२ चे वर्ग / प्रात्यक्षिके प्रत्यक्ष (ऑफलाईन) सुरु करण्याबाबतचे परिपत्रक क्र. शाअमज / विवि / २०२१ / १६८९ दि. १६ ऑक्टोबर, २०२१

वरील विषयाच्या अनुषंगाने, कोव्हीड लसीचे दोन डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी दि. २० ऑक्टोबर, २०२१ पासून शैक्षणिक वर्ष २०२१-२२ चे वर्ग / प्रात्यक्षिके प्रत्यक्ष (ऑफलाईन) सुरु करण्याबाबत या आधीच या महाविद्यालयाने संदर्भाधीन परिपत्रक काढलेले आहे. मध्यंतरीच्या काळात राज्य सरकारच्या 'युवा स्वास्थ्य अभियान' अंतर्गत महाविद्यालयाने विद्यार्थी व अध्यापक/कर्मचारी यांचेसाठी कोव्हीड लसीकरण कार्यक्रम घेतलेला आहे. या अनुषंगाने असे कळविण्यात येते की, कोव्हीड लसीचे दोन डोस घेतलेल्या व ऑफलाईन (प्रत्यक्ष) पद्धतीने वर्ग / प्रात्यक्षिके यांना उपस्थित राहू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी संबंधित वर्गशिक्षक / विभागप्रमुख यांचेशी संपर्क साधावा. तसेच येतांना कोव्हीड लसीचे दोन डोस घेतल्याचे प्रमाणपत्र आणणे आवश्यक आहे.

(टीप: राज्य सरकारच्या निर्देशांनुसार सद्यस्थितीत महाविद्यालयाने शिक्षणाचे ऑनलाईन व ऑफलाईन असे दोन्ही पर्याय विद्यार्थ्यांना खुले ठेवलेले आहेत.)

GOVT. COLLEGE OF ENGINEERING ★ JALGAON

प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव

प्रत -

१. सर्व विभागप्रमुख यांचे माहितीसाठी - त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी आपापल्या विभागातील विद्यार्थ्यांना व वर्गशिक्षकांना वरील सूचना निदर्शनास आणावी.
२. मुख्य सूचना फलक / विद्यार्थी ग्रुप माहितीस्तव
३. सुरक्षा रक्षक, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, जळगाव